# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

(दुपार)

**दिनांक २२.०८.२०२६ शनिवार**

**१) विद्यार्थ्याचे हित व सुरक्षा संबंधाने ''आमची शाळा—आमची सुरक्षा'' कार्यक्रम संपन्न :—**

मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांचे अध्यक्षतेखाली नागपुर शहरातील शैक्षणिक संस्थांमधील विद्यार्थ्याचे हित व सुरक्षा संबंधाने ''आमची शाळा—आमची सुरक्षा'' कार्यक्रमाचे आयोजन **दिनांक २२.०८.२०२६ रोजी ११.०० वा.** पोलीस भवन, ऑडोटोरीयम हॉल, सिव्हील लाईन, नागपूर येथे करण्यात आले होते. कार्यक्रमामध्ये नागपुर शहरातील सर्व शाळांचे मुख्याध्यापक व प्राचार्य, शाळा प्रशासक व सुरक्षा अधिकारी यांना निमंत्रीत करण्यात आले होते. कार्यक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांना वाहतुकीविषयी जागरूकता, नियमांचे पालन, लैंगीक विषयावरील जागृती, अंमली पदार्थांविषयी जागृती व शाळा—महाविद्यालय परिसर व विद्यार्थ्यांची सुरक्षा यावर चर्चा व उपाययोजना असा होता. कार्यक्रमाची प्रस्तावना मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह पोलीस आयुक्त, नागपुर शहर यांनी केली.

कार्यक्रमास उपस्थितांसोबत विद्यार्थ्यांचे सुरक्षेविषयी सविस्तर चर्चा करण्यात आली. त्यामध्ये मा. श्रीमती विनीता शाहु, अपर पोलीस आयुक्त (उत्तर प्रभाग) नागपुर शहर यांनी मुलींचे सुरक्षेचे दृष्टीकोनातुन विशेष लक्ष वेधले. पुढे त्यांनी मुलींबाबत घडणारे गुन्हे, त्यावरील प्रतीबंध म्हणुन उपाय—योजना तसेच, त्यांचे व्यक्तीगत बाबींचा समावेश कायद्ये यांविषयी माहीती देवुन मार्गदर्शन केले. तसेच शाळकरी मुले—मुली हे अल्पवयीन असल्याने त्यांचेबाबत कायद्यात पोक्सो अंतर्गत तरतुदी असुन त्याविषयीसुध्दा त्यांनी उपस्थीतांना सविस्तर माहीती दिली.

मा. पोलीस उपआयुक्त श्री. आदीत्य मिरखेलकर (वाहतुक) यांनी विद्यार्थी वाहतुक, शालेयबस सुरक्षीतता विषयी कायदेशिर बाबी तर श्री. दीपक अग्रवाल (गुन्हे) यांनी सायबर सुरक्षा संबंधी तसेच, श्री. संदीप पखाले (विशेष शाखा) यांनी पोलीस दिदी व पोलीस काका मोहीमेबाबत आणि लैंगीक घटना शालेय परीसरात घडु नये याकरीता करावयाच्या उपाययोजना तसेच, कोणतीही अनुचित घटना शालेय परीसरात घडल्यास त्यांविषयी फोरस्टेप इव्ह्याक्युवेशन प्लान यांबाबत उपस्थितांना माहीती दिली.

मा. पोलीस आयुक्तांनी कार्यक्रमास उपस्थितांना संबोधीत करतांना सांगीतले की, शालेय विद्यार्थ्यांचे मनाचा विचार करता त्यांचेशी संवाद वाढवुन, मैत्रीपुर्ण संबंध कसे प्रस्थापीत होतील यांविषयी योग्य ते मार्गदर्शन केले. तसेच, शालेय परिसरात असलेल्या सिसिटीव्हीचे घटनेनंतर फक्त पाहणी न करता, त्यास दररोज मॉनिटरींग करणे कसे गरजेचे आहे, त्याचप्रमाणे सुरक्षा अधिकारी यांनी ही जबाबदारी वैयक्तीकरित्या घेणे बंधनकारक आहे याबाबत उपस्थीतांना सांगुन, पोलीस जनतेचे सेवक आहेत, मात्र नागरीकांनीही खाजगी पोशाखातील पोलीस होवुन शक्य होईल तेव्हा, शक्य तेव्हढी मदत पोलीसांना करावी असे आवाहन केले. मा. पोलीस आयुक्त यांनी उपस्थित शिक्षणअधिकारी तसेच, मुख्याध्यापक व प्राचार्य यांचेमध्ये संवादात्मक सत्रामध्ये अडी—अडचणी जाणुन घेवुन त्याबाबत योग्य त्या उपाययोजना सुचविल्या.

कार्यक्रमास मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह पोलीस आयुक्त, नागपुर शहर, मा. अपर पोलीस आयुक्त श्री. राजेंद्र दाभाडे (गुन्हे), श्रीमती विनीता शाहु (उत्तर प्रभाग), श्री. वसंत परदेशी (दक्षिण प्रभाग), मा. पोलीस उपायुक्त, श्री. संदीप पखाले (विशेष शाखा), श्री. रमेश धुमाळ (परि. क्र. ६), श्री. आदीत्य मिरखेलकर (वाहतुक शाखा), मा. उपसंचालक नागपुर शहर श्री. दिपेन लोखंडे (शिक्षण विभाग), मा. शिक्षणाधिकारी तसेच, मा. मनपा चे शिक्षणाधिकारी तथा वरीष्ठ पोलीस अधिकारी, महाविद्यालयांचे प्राचार्य, शाळांचे मुख्याध्यापक, कॉलेज व शालेय सुरक्षा अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थीत होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन मसपोनि. पुनम कोरडे यांनी व आभार प्रदर्शन मा. अपर पोलीस आयुक्त श्री. राजेंद्र दाभाडे यांनी केले.










<u>**२) उत्कृष्ट तपास करणारे अधिकारी व अंमलदार यांचा गौरव :—**</u>

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय, दक्षिण प्रभाग अंतर्गत पोलीस ठाणे बेलतरोडी, हुडकेश्वर व यशोधरानगर येथे दाखल असलेल्या गुन्हयातील आरोपींचा शोध घेऊन, गुन्हा उघडकीस आणून, गुन्हयातील मुद्येमाल हस्तगत करणारे पोलीस अधिकारी व अंमलदार यांचा मा. श्री. वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त (दक्षिण प्रभाग) नागपूर शहर यांनी दिनांक २१.०८.२०२६ रोजी त्यांचे कार्यालयात प्रमाणपत्र देऊन गौरव केला.

दिनांक २०.०८.२०२६ रोजी, पोलीस ठाणे बेलतरोडी येथील खुनाचे घटनेतील आरोपी हे घटना करून पळुन जात असतांना, बीट मार्शल पोअं. मनिष भलमे व नरेश हे अजनी हद्दीत नरेंद्र नगर परीसरात पेट्रोलींग करीत असतांना, त्यांना आरोपी दिसल्याने त्यांनी त्यांचा पाठलाग करून, ताब्यात घेतले होते.

पोलीस ठाणे हुडकेश्वर येथील अधिकारी व अंमलदार यांनी दाखल घरफोडीचे गुन्ह्यातील आरोपींचा सिसिटीव्ही फुटेज वरून तांत्रीक तपास करून आरोपीस निष्पन्न करून, घरफोडीचा गुन्हा उघडकीस आणला. गुन्ह्याचे तपासात आरोपींकडुन पो. ठाणे हुडकेश्वर व ईतर पोलीस ठाणे येथील एकुण ०९ गुन्हे उघडकीस आणुन, किंमती अंदाजे ११,१९,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त केला होता.

पोलीस ठाणे यशोधरानगर पोलीसांनी पेट्रोलींग दरम्यान, मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, सापळा रचुन ॲक्टीवा मोपेडवरील संशयीतांना ताब्यात घेवुन त्यांचेकडुन एकुण २८.६९ ग्राम एमडी पावडर अंमली पदार्थ किंमती ३,१८,४००/—रू. चा मुद्देमाल जप्त करून ०३ आरोपींना अटक केली होती. तसेच, पोलीस ठाणे

हद्दीत दाखल जेसिबी चोरीचे गुन्ह्याचा तांत्रीक तपास करून, गुन्हा उघडकीस आणुन आरोपीस निष्पन्न केले व त्याचे ताब्यातुन जेसिबी किंमती २५,००,०००/—रू.किंमतीचा मुद्देमाल जप्त करून आरोपीस अटक केली होती.

पोलीस ठाणे हुडकेश्वर येथील दाखल विनयभंग व पोक्सो अंतर्गत गुन्ह्यातील आरोपीविरूध्द कोर्टात दाखल खटल्यामध्ये तपासी अधिकारी तसेच, कोर्ट पैरवी मपोअं. किरण व प्रिती यांनी दोषसिध्दी करीता आवश्यक ती कारवाई करून गुन्ह्यातील आरोपीला मा. कोर्टाने सश्रम कारावासासह दंडाची शिक्षा ठोठावली.

वरील सर्व गुन्ह्यातील आरोपींना अटक करणारे, गुन्हे उघडकीस आणुन मुद्देमाल जप्त करणारे व उत्कृष्ठ दोषसिध्दी करणारे अधिकारी व अंमलदार यांचा मा. अपर पोलीस आयुक्त (दक्षिण प्रभाग) यांनी सत्कार करून, पुढेही अशीच कारवाई करतील अशी अपेक्षा व्यक्त करून अंमलदारांचे मनोधैर्य उंचाविले.




**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची म.दा.का., जुगार व मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक २१.०८.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. व अंमली पदार्थ कायद्यान्वये १४ केसेसमध्ये १४ ईसमावर कारवाई करून एकुण ३,८६,९६०/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. जुगार कायदा अन्वये ०२ केसेसमध्ये १२ इसमांवर कारवाई करुन २,४६,३३०/—रु. चा मुद्येमाल जप्त करण्यात आला आहे.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली ३,०७७ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. १,७६,४५०/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

दिनांक २१.०८.२०२६ चे २३.०० वा. ते दिनांक २२.०८.२०२६ चे ०५.०० वा. चे दरम्यान, केलेल्या रात्रगस्तीमध्ये कलम १३५ म.पो.का. कायद्यान्वये **०२** इसमावर कारवाई करण्यात आलेली आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) गुन्हेशाखा सोनसाखळी चोरी विरोधी पथकाची कामगिरी :— जबरी चोरी करणाऱ्या आरोपींना ४८ तासाचे आंत अटक.**

दिनांक १८.०८.२०२६ चे ०८.३० वा. चे सुमारास, फिर्यादी अरविंद रघुविर प्रजापती, वय ३३ वर्षे, रा. टोलारटोला, वार्ड नं. १, तह. शिलवानी, जि. रायसेन (म.प्र.) हे पोलीस ठाणे गणेशपेठ हद्दीत रामझुला पुलावरून पायदळ जात असतांना पुलावर अज्ञात ०४ आरोपींनी संगणमत करून, फिर्यादीचे हातपाय पकडुन त्यांचे खिशातील रोख ५,६५०/—रू व मोबाईल फोन असा एकुण २०,६५०/—रू. मुद्देमाल जबरीने हिसकावुन त्यांना मारहाण करून, धमकी देवुन घटनास्थळाहुन पळुन गेले. अशा फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे गणेशपेठ येथे आरोपींविरूध्द कलम ३०९(४),११५(२),३(५) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे समांतर तपासात, गुन्हेशाखा सोनसाखळी चोरी विरोधी पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक तपास करून व मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून आरोपींना निष्पन्न केले व सापळा रचुन आरोपी नामे १) विनोद उर्फ मायकल गुड्डु फ्रान्सीस, वय ५० वर्षे, २) गर्जेश सुदामहुर मालाकार, वय १९ वर्षे, ३) कन्हैय्या कृष्णा मालाकार, वय २९ वर्षे, दोन्ही रा. महाकाली कॉलोनी, प्रकाश नगर, चंद्रपुर, ४) राहुल उर्फ पगला मानिक मालाकार, वय १९ वर्षे, रा. अंगुल (ओडीसा) चौघेही ह.मु.–रा. रा. संत्रा मार्केट, चॉदशहा दर्गाह जवळील फुटपाथवर, गणेशपेठ, नागपुर यांना ताब्यात घेवुन, विचारपूस केली असता, त्यांनी वर नमुद जबरी चोरीचा गुन्हा संगणमताने केल्याची कबुली दिली. आरोपींचे ताब्यातुन गुन्ह्यातील चोरी केलेला मोबाईल व ईतर असे ०२ मोबाईल फोन, रोख ४५०/–रू. असा एकुण ३०४५०/–रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपींना मुद्देमालासह पुढील कार्यवाहीस्तव गणेशपेठ पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, मसपोनि. मंगला हरडे, पोहवा. मनिष बुरडे, प्रफुल्ल मानकर, संदीप भोकरे, पोअं. पंकज बागडे, कुणाल लांडगे, अनिकेत इंगळे, संदीप पडोळे यांनी केली.



**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे राणाप्रताप नगर :– शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक २१.०८.२०२६ चे २३.५५ वा. चे सुमारास, प्रतापनगर पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना खात्रीशीर माहीती मिळाली की, एनपिटीआय चे गल्लीमध्ये गायत्रीनगर येथे लाल रंगाचा शर्ट व काळ्या रंगाचा फुलपॅन्ट घातलेला ईसम शस्त्रासह फिरत आहे. अशा खात्रीशीर माहीतीवरून नमुद ठिकाणी गेले असता, मिळालेल्या वर्णनाचा ईसम पोलीसांना पाहुन पळु लागल्याने त्याचा पाठलाग करून ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्याचे नांव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नांव रितेश सुरेश विश्वकर्मा, वय २३ वर्षे, रा. पठाण ले–आऊट येथे किरायाने, राणाप्रताप नगर, नागपुर असे सांगीतले. त्याची अंगझडती घेतली असता, त्याचे कंबरेत पॅन्टचे आंत एक फोल्डींगचा चाकु किंमती २००/– रु. चा मुद्देमाल लपवुन ठेवलेला मिळुन आल्याने, जप्त करण्यात आला.

आरोपी हा कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने शस्त्र बाळगुन समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, सरतर्फे फिर्यादी पोहवा. दिनेश भोगे यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे राणाप्रताप नगर येथे पोउपनि. साईनाथ काकरवाल यांनी आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे तहसिल :— निष्काळजीपणे मृत्युस कारणीभुत ठेकेदाराविरूध्द गुन्हा दाखल.**

फिर्यादी राधेशाम प्रसादी यादव, वय ३२ वर्षे यांचा भाऊ बलराम प्रसादी यादव, वय ३५ वर्षे, तसेच, कुंदन रघुवंशी, वय ५० वर्षे, सर्व रा. भैसनवाडी, तह. लखनादौन, जि. शिवनी (मध्यप्रदेश), तसेच गावातील ईतर ०३ ईसम यांना मजुरीकामासाठी ठेकेदार नामे अरविंद ताराचंद रामटेके, वय ५० वर्षे, रा. नामदेवनगर, कावरापेठ, शांतीनगर, नागपुर याने नागपुर येथे आणले होते. दिनांक २१.०७.२०२६ चे १६.०० वा. चे सुमारास, ठेकेदार यांनी सर्वांना हॉटेल तनविर, गितांजली चौक, मोमीनपुरा येथे आणुन संडास तोडण्याचे कामास लावले होते. सर्वजण हे संडास तोडुन मलबा बाहेर टाकण्याचे काम करीत होते. अचानक हॉटेल तनविर येथील भिंत पडुन भिंतीखाली फिर्यादीचा भाऊ बलराम प्रसादी यादव व कुंदन रघुवंशी हे दोघे दबल्याने गंभीर जखमी झाले. त्यांचे सोबत काम करणारे यांनी त्यांना बाहेर काढुन उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल येथे नेले. ठेकेदार यांनी तेथुन त्यांना सेव्हनस्टार हॉस्पीटल, नंदनवन येथे दाखल केले असता, उपचारादरम्यान दिनांक २२.०८.२०२६ चे ०१.२५ वा. डॉक्टरांनी फिर्यादीचा भाऊ बलराम यादव यांना तपासुन मृत घोषीत केले. ठेकेदार याने कुंदन रघुवंशी याचा अपुर्ण उपचार करून, त्यास घरी पाठवुन दिले. यातील ठेकेदार याने फिर्यादी, मृतक, जखमी व ईतर मजुर यांचे कडुन काम करवुन घेतांना कोणतेही सुरक्षा उपकरणे न देता, निष्काळजीपणे काम करवुन, मृतकाचे मृत्युस व जखमींचे जखमी होण्यास कारणीभुत असल्याचे फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून याप्रकरणी पोलीस ठाणे तहसिल येथे पोउपनि. संजय माने यांनी आरोपी ठेकेदार विरूध्द कलम १०६(अ), १२५(ब) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(मिसिंग)**

**१) पोलीस ठाणे अजनी :—** अंकीत कुमेश चंद्रवंशी, वय १९ वर्षे, रा. आमगांव, तह. कुरई, थाना लखनवाडा, जि. शिवनी (मध्य प्रदेश) हा दिनांक ०९.०८.२०२६ चे ११.०० वा. पासुन पोलीस ठाणे अजनी हद्दीतील मेडीकल हॉस्पीटल येथे उपचारार्थ दाखल असलेल्या त्याचे आजीला बघायला आला असता, तेथुन कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेला. घरी परत आला नाही. त्याचा शोध घेतला असता मिळून आला नाही. **वर्णन** रंग—गोरा, चेहरा—गोल, बांधा—मजबुत, उंची— ५ फुट ६ इंच, केस—काळे, डोळे— काळे, अंगात— फुलबाहीचा शर्ट व फुलपॅन्ट घालतो. भाषा— हिंदी बोलतो. ओळख— उजवे हातावर ‘अंकीत’ असे नांव गोंदलेले आहे.

**२) पोलीस ठाणे सिताबर्डी :—** किसन प्रसाद कश्यप, वय ३१ वर्षे, रा. डब्ल्युसिएल कॉलोनी, सावनेर, जि. नागपुर हे दिनांक १८.०८.२०२६ रोजी पोलीस ठाणे सिताबर्डी हद्दीतील गोविंद हॉस्पीटल येथे उपचार करून पोलीस ठाण सिताबर्डी हद्दीत दुकानात थांबले असता, तेथुन कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेले. घरी परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाही. **वर्णन** रंग—गोरा, चेहरा—गोल, बांधा—सडपातळ, उंची— ५ फुट २ इंच, केस—काळे, डोळे— काळे, अंगात— काळ्या रंगाचा चेक्सचा शर्ट व निळ्या रंगाचा जिन्स पॅन्ट घातलेला आहे. भाषा— हिंदी बोलतो. ओळख— मानसिक रूग्ण आहे.

**३) पोलीस ठाणे सिताबर्डी :—** कु. सपना लालसिंग राजपुत, वय १८ वर्षे, रा. धरमपेठ, गवळीपुरा, सिताबर्डी, नागपुर ही दिनांक १८.०८.२०२६ चे ०९.०० वा. पासुन पोलीस ठाणे सिताबर्डी हद्दीतील राहते घरून कॉलेजला जाते असे सांगुन कुठेतरी निघुन गेली. घरी परत आली नाही. तीचा शोध घेतला असता मिळून आली नाही. **वर्णन** रंग—गोरा, चेहरा—लांबट, बांधा—सडपातळ, उंची— ५ फुट ५ इंच, केस—काळे, डोळे— काळे, अंगात— पांढरे रंगाचा गुलाबी पट्टे असलेला शर्ट व जिन्सपॅन्ट घातलेला आहे. भाषा— हिंदी बोलते. ओळख— ओठाजवळ तीळ आहे.


अंकीत


किसन


कु. सपना

**स्वा/—**

**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**